| | |
|---|---|
| MHKO110004182017 | **नियमित दिवाणी दावा क्रमांक ५६/२०१७ मधील निशाणी क्र. २२ वरील आदेश**<br>**( श्रीमती आक्कुबाई आप्पा नाईक विरुध्द श्री .बापू कृष्णा नाईक )** |

वादी यांनी सदरचा अर्ज प्रतिवादी क्रमांक २ सुखदेव कृष्णा नाईक यांचे कायदेशीर प्रतिनिधी अभिलेखावर आणणेस झालेला विलंब माफ होऊन मिळणेसाठी दाखल केला आहे.

२. वादी यांचे असे कथन आहे की, प्रतिवादी क्रमांक २ सुखदेव कृष्णा नाईक यांचे दिनांक १०.०५.२०१९ रोजी निधन झालेले आहे. परंतू सदरची बाब ही वादीस दिनांक १९.०७.२०१९ रोजी ज्ञात झाले. परंतू प्रतिवादी क्रमांक २ चे वारस हे वेगवेगळे गावी राहणेस असलेमुळे त्यांची माहीती गोळा करुन प्रतिवादी क्रमांक २ चा मृत्यूदाखला प्राप्त करणे व त्या अनुषंगाने अर्ज न्यायालयात दाखल करणे निर्धारीत कालावधीत शक्य झालेले नाही. त्यामुळे सदरचे कायदेशीर प्रतिनिधी अभिलेखावर घेणेस २ महीने २५ दिवसांचा विलंब झालेला आहे. वादी यांनी प्रतिवादी क्रमांक २ चे वारस रेकॉर्डवर आणणेसाठी जाणुनबुजून टाळाटाळ केलेली नाही. प्रस्तुतचा अर्ज मंजूर झालेस प्रतिवादी यांचे कोणतेही नुकसान होणार नाही. याउलट नामंजूर झालेस वादी यांचे कधीही न भरुन येणारे नुकसान होणार आहे. तसेच दावेचे कामी गुंतागुंत निर्माण होवून वादी यांना विनाकारण न्यायापासून वंचीत रहावे लागणार आहे.

३. प्रतिवादी क्रमांक १ ते ६ यांनी आपले म्हणणे सादर करुन योग्य ते आदेश करणेबाबत विनंती केली आहे . प्रस्तुतचा अर्ज हा मुदतीत नसल्यामुळे दिवाणी नियमावलीतील तरतूदींप्रमाणे प्रतिवादी क्रमांक २ च्या वारसांना माझ्या पूर्वीधिकारी यांनी नोटीस काढून त्यांचे म्हणणे मागवले होते. परंतू त्यांना विहीत वेळेत नोटीस मिळूनदेखिल त्यांनी त्यांचे म्हणणे दाखल केले नाही . सबब प्रस्तुतचा अर्ज हा त्यांचे म्हणणेशिवाय चालविणेत आला.

४. वादी यांच्या अर्जाचे व अभिलेखाचे अवलोकन केले. सदरचा दावा वादी यांनी प्रतिवादी यांनी केलेले अतिक्रमण काढून घेणेकरीता दाखल केलेला आहे. वादी यांनी सदरचा अर्ज शपथेवर दाखल केला आहे. सदरच्या दाव्याचा गुणदोषावर निकाल करणेसाठी प्रतिवादी क्रमांक २ चे वारस अभिलेखावर येणे गरजेचे आहे. त्याकरीता वादी यांनी केलेला विलंब माफ होणे गरजेचे आहे. प्रतिवादी क्रमांक २ चे वारस अभिलेखावर घेतल्यामुळे प्रतिवादी यांचे कोणतेही नुकसान होणार नाही. उलट दाव्याचा अंतिम न्यायनिर्णय करणेसाठी मदत होणार आहे. वादींच्याच म्हणण्याप्रमाणे प्रतिवादी क्रमांक २ च्या मृत्यूबाबत त्यांना दिनांक १९.०७.२०१९ रोजी माहीती झालेली होती . परंतू तरीदेखिल त्यांनी दिनांक ०५.१०.२०१९ रोजी प्रस्ततचा अर्ज दाखल केला आहे. त्यामुळे वादी यांना त्याचेवर त्यांनी केलेल्या उशीरासाठी खर्च बसवू सदरचा अर्ज मंजूर करणे न्यायोचीत वाटते . सबब खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे.

**– आ दे श –**

वादी यांचा निशाणी क्र. २२ वरील अर्ज, प्रतिवादी यांना खर्चादाखल रक्कम रुपये २००/– (अक्षरी रुपये दोनशे मात्र) पुढील तारखेपर्यंत देणेच्या अटीवर मंजूर करण्यात येत आहे.

SHASHANK DIVAKAR SHIRSAT

Digitally signed by SHASHANK DIVAKAR SHIRSAT
Date: 2022.11.21 11:54:10 +0530

ठिकाण – पेठवडगांव (एस.डी.शिरसाट)

दिनांक– १९/११/२०२२ दुसरे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर.

पेठवडगांव